महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/जाहिरात दिनांक:- २७ जानेवारी,२०२२

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक २६०/२०२१, २६१/२०२१ व २६२/२०२१**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० च्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द उत्तरतालिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ५७१/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्या ८६ उमेदवारांना दिनांक २९ व ३० जानेवारी, २०२२ रोजी आयोजित परीक्षेसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देऊन नियोजित दिनांकास परीक्षेचे आयोजन करण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाकडून सदर ८६ उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था तातडीने करण्यात आली होती.

**२.** मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाख़ल मूळ अर्ज क्रमांक ८२/२०२२, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ११०/२०२२ तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ७४३/२०२१, ६२/२०२२ व १९८/२०२२ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाकडून उपरोक्त ८६ उमेदवारांव्यतिरिक्त काही अतिरिक्त उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात विषयांकित परीक्षेस प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत.

**३.** कोणत्याही परीक्षेकरीता प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांच्या संख्येच्या मर्यादेत आयोगाच्या कार्यालयाकडून उत्तरपत्रिका व प्रश्नपुस्तिकांची छपाई करण्यात येते. यामध्ये ऐनवेळी कोणत्याही कारणामुळे प्रवेश द्यावयाच्या उमेदवारांच्या संख्येत अल्प प्रमाणात होणारी संभाव्य वाढ विचारात घेतली जाते. विषयांकित परीक्षेच्या अनुषंगाने राज्यातील विविध न्यायालयांनी दिलेल्या आदेशामुळे उमेदवारांच्या पूर्वनिश्चित संख्येपेक्षा खूप जास्त उमेदवारांना प्रवेश द्यावा लागणार असल्याने आयोगाकडून छपाई करण्यात आलेल्या प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिकाच्या आधारे परीक्षा आयोजित करणे तसेच, परीक्षेच्या आयोजनासंदर्भातील इतरही संबंधित बाबींची व्यवस्था करणे अल्पकालावधीत शक्य होणार नाही. यास्तव, दिनांक २९ जानेवारी, २०२२, दिनांक ३० जानेवारी, २०२२, दिनांक ५ फेब्रुवारी २०२२ व दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित विषयांकित परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

**४.** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२०च्या उत्तरतालिकेसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक १०५६/२०२१ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याच्या आधारे विषयांकित परीक्षेच्या आयोजनासंदर्भातील पुढील निर्णय घेण्यात येऊन परीक्षेचे सुधारित दिनांक निश्चित करण्यात येतील. अंतिम न्यायनिर्णय येईपर्यंत परीक्षेच्या आयोजनासंदर्भातील सर्व प्रक्रिया स्थगित करण्यात येत आहे.

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग